



# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील

www.godateer.com

RNI No.6331/62

REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026






* वर्ष ६५ वे * अंक २८७ * नांदेड * बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# तीन ठिकाणी महाविकास आघाडी तर महायुती दोन जागांवर पुढे

## पदवीधर व शिक्षक विधान परिषद निवडणूक

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांतील पाच जागांच्या निवडणुकीच्या मतमोजणीत महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळत आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघात महायुतीचे सुधाकर कोहळे यांनी पहिल्या फेरीत निसटती आघाडी घेतली, तर मराठवाडा पदवीधर मतदारसंघात प्रतापसिंह पाटील हे सतीश चव्हाण यांच्यापेक्षा चार हजार मतांनी पुढे होते. अमरावती शिक्षक मतदारसंघात महायुतीचे किरण सरनाईक आघाडीवर असून काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना पहिल्या पसंतीची १ हजार ३१९ मते मिळाली. पुणे पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या हर्षदा देशमुख यांनी पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये आघाडी घेतली आहे.

शुक्रवारी मतदान झाल्यानंतर मंगळवारी सकाळी आठ वाजल्यापासून पाचही मतदारसंघांतील मतमोजणीला सुरुवात झाली. नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजप आणि काँग्रेसमध्ये अटीतटीची लढत अपेक्षित असताना पहिल्या फेरीत सुधाकर कोहळे यांनी निसटती आघाडी घेतली. या फेरीत सुमारे ८४ हजार मतपत्रिकांची मोजणी अपेक्षित असून, वृत्त प्रसिद्ध होईपर्यंत मतमोजणी सुरू होती. त्यामुळे अंतिम निकालाबाबत स्पष्टता आलेली नव्हती.

मराठवाडा पदवीधर मतदारसंघात प्रतापसिंह पाटील यांनी सतीश चव्हाण यांच्यावर तीन हजार मतांची आघाडी घेतल्याची माहिती समोर आली. या मतदारसंघातील लढतीकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघात महायुतीचे किरण सरनाईक यांनी पहिल्या फेरीतील मतमोजणीत आघाडी घेतली. उपलब्ध आकडेवारीनुसार सरनाईक यांना ३ हजार ९०३ मते मिळाली. शिवसेनेतील बंडखोर उमेदवार श्रीकांत देशपांडे यांना २ हजार २०९, अपक्ष सुरेश देवकर यांना १ हजार ५८२, काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना १ हजार ३१९, तर उबाठाचे दत्तात्रय लहाने यांना १ हजार १६९ मते मिळाली. भाजपच्या बंडखोर उमेदवार संगीता शिंदे यांना ६९८, तर शेखर भोयर यांना ४३२ मते मिळाली. त्यामुळे काँग्रेसच्या उमेदवाराला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागल्याचे चित्र होते.

पुणे पदवीधर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या हर्षदा देशमुख आणि स्मिता जाधव यांच्यात चुरस पहायला मिळत आहे. पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये हर्षदा देशमुख आघाडीवर होत्या. पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे पहिल्या पसंतीच्या मतांमध्ये आघाडीवर दिसून आले. अद्याप मतमोजणी सुरू असल्याने आकड्यांमध्ये बदल होण्याची शक्यता असून अंतिम निकालानंतरच महायुती आणि महाविकास आघाडीचे नेमके यश स्पष्ट होणार आहे.

# मराठवाडा 'पदवीधर'चा मतदारसंघाचा निकाल फिरला, शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रतापसिंह पाटील यांची आघाडी



### आपणच आमदार होणार –प्रतापसिंह पाटील

(राष्ट्रवादी काँग्रेस – शरद पवार गट) उमेदवार प्रतापसिंह पाटील यांनी आपल्या विजयाचा भक्कम विश्वास व्यक्त केला आहे. आमचे परफेक्ट नियोजन होते आणि कार्यक्रम करेक्ट झालेला आहे. त्यामुळे या निवडणुकीत आपणच आमदार होणार, असा दावा पाटील यांनी केला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीत मोठा उलटफेर पाहायला मिळत असून, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (महाविकास आघाडी) उमेदवार प्रतापसिंह पाटील यांनी सुरुवातीपासूनच भक्कम पकड निर्माण केली आहे. प्रतापसिंह पाटील यांनी तब्बल चार हजार मतांची मोठी आघाडी घेतली आहे.

मंगळवारी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीला झालेल्या टपाली (पोस्टल) मतपत्रिकांच्या मोजणीत वैध ठरलेल्या ४९४ मतांपैकी ४५० मतांची मोजणी पूर्ण झाली. यामध्ये महायुतीचे उमेदवार सतीश चव्हाण यांना १७४ मते तर महाविकास आघाडीचे उमेदवार प्रतापसिंह पाटील यांना १४७ मते मिळाली. त्यामुळे टपाली मतदानात सतीश चव्हाण यांनी २७ मतांची किरकोळ आघाडी घेतली होती. याशिवाय ठाकरे गटाचे दिलीप घुगे यांना ३७ आणि रविराज साबळे यांना २५ मते मिळाली. मात्र, प्रत्यक्ष मतदानाची मोजणी सुरू झाल्यानंतर चित्र पूर्णपणे बदलले. एकूण ३५ हजार मतांची मोजणी पूर्ण झाली असून, यामध्ये प्रतापसिंह पाटील यांनी मुसंडी मारत महायुतीचे सतीश चव्हाण यांना मागे टाकले आहे आणि तब्बल चार हजार मतांची निर्णायक आघाडी मिळवली आहे.

मराठवाड्यात महायुतीचे सतीश चव्हाण पिछाडीवर पडल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सध्या मतमोजणीची प्रक्रिया वेगाने सुरू असून, रात्री उशिरा किंवा पहाटेच्या सुमारास या या मतदारसंघाचा अंतिम निकाल स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

दरम्यान संध्याकाळी हाती आलेल्या कलानुसार राज्यातील विधान परिषदेच्या एकूण ५ जागांसाठी मतमोजणी सुरू असून, काही ठिकाणी अटीतटीची लढत तर काही ठिकाणी एकतर्फी निकाल पाहायला मिळत आहेत. सद्यस्थितीनुसार ५ जागांपैकी ३ जागांवर महायुती तर २ जागांवर महाविकास आघाडीचे उमेदवार आघाडीवर आहेत. मात्र, मराठवाड्यात शरद पवारांच्या पक्षाचे प्रतापसिंह पाटील यांनी घेतलेल्या मोठ्या आघाडीमुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# अर्नब चक्रीवादळाचा धोका वाढला! नऊ राज्यांना सतर्कतेचा इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** बंगालच्या उपसागरात तयार झालेले अर्नब चक्रीवादळ आता आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या दिशेने सरकत आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, हे चक्रीवादळ २८ ऑक्टोबर रोजी दुपारपर्यंत आंध्र प्रदेशातील बापटला आणि विशाखापट्टणम दरम्यान असलेल्या यानमजवळ किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने आंध्र प्रदेश, ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड, बिहार आणि पूर्व उत्तर प्रदेशसह नऊ राज्यांसाठी सतर्कतेचा इशारा दिला आहे.

पुदुचेरीमध्येही खबरदारीचे उपाय योजले जात आहेत. चक्रीवादळामुळे अनेक विमानसेवा रद्द करण्यात आल्या आहेत. रेल्वेने ९० हून अधिक गाड्या रद्द केल्या आहेत. याव्यतिरिक्त आंध्र प्रदेश, झारखंड आणि ओडिशामधील शाळा व महाविद्यालयांना सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

दिल्ली–एनसीआर प्रदेशासह अनेक राज्यांमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता आहे. हा केवळ हवामानाचा इशारा नसून किनारपट्टी भागात राहणाऱ्या लाखो लोकांच्या सुरक्षितता, उपजीविका आणि पायाभूत सुविधांसाठी एक गंभीर धोका आहे. नागरिकांनी वादळाची तीव्रता त्याचे संभाव्य परिणाम आणि प्रशासनाने केलेली तयारी समजून घेणे महत्त्वाचे आहे.

अर्नब चक्रीवादळ किनारपट्टीवर धडकण्यापूर्वी गंजम जिल्ह्यातील लोकांना चक्रीवादळ निवारण केंद्रांमध्ये हलवण्यात आले आहे. ओडिशातील मलकानगिरी येथे मंत्री नित्यानंद गोंड यांनी मोटू येथील पूरग्रस्तांच्या मदत शिबिराला भेट दिली. त्यांनी लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्याच्या व्यवस्थेचा आढावा घेतला आणि पूरग्रस्तांसाठी असलेल्या निवास व भोजन सुविधांची पाहणी केली. आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथे आलेल्या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने सखल भागात राहणाऱ्या लोकांना वाकलापुडी गावातील पुनर्वसन केंद्रात हलवले आहे.

# एमआयडीसीतील शिवगंगा ऑईल मिलमधून हजारो किलो तेलाचा साठा जप्त

## शेंगदाणा, सोयाबीन, सूर्यफूल तेलाचे नमुने तपासणीसाठी; एफडीएची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध, सुरक्षित महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाने भेसळखोरांविरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. नांदेड एमआयडीसीतील एका ऑईल मिलवर छापा टाकून तब्बल २० लाख ९९ हजार रुपयांचे ९ हजार ७४४ किलो संशयित भेसळयुक्त खाद्यतेल जप्त करण्यात आले आहे. गुप्तवार्ता विभाग, छत्रपती संभाजीनगर आणि येथील अन्न व औषध प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने दि. २६ ऑक्टोबर रोजी ही कारवाई केली.

एमआयडीसीतील डी–१९ येथे असलेल्या मे. शिवगंगा ऑईल मिल या खाद्यतेल उत्पादक पेढीवर भेसळयुक्त तेलाची विक्री होत असल्याची गोपनीय



माहिती मिळाली होती. त्यानुसार टाकलेल्या छाप्यात विक्रीसाठी ठेवलेले डबल फिल्टर्ड शेंगदाणा तेल, परिष्कृत सोयाबीन तेल आणि परिष्कृत सूर्यफूल तेल या खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. या तेलात भेसळ असल्याच्या संशयावरून संपूर्ण साठा जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई सहआयुक्त (अन्न), छत्रपती संभाजीनगर करकाळे यांच्या निर्देशानुसार आणि सहायक आयुक्त (अन्न), नांदेड परिमंडळ–१ सु. दा. जिंतुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात गुप्तवार्ता विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी योगेश चिभडे आणि नांदेडचे अन्न सुरक्षा अधिकारी अ. के. दुधाटे व संतोष कनकावाड यांचा समावेश होता. नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत यासाठी तपासणी मोहीम सुरू असून, भेसळ रोखण्यासाठी नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# सौदी अरेबियाच्या संरक्षण मंत्रालयावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सौदी अरेबियामध्ये मंगळवारी सौदी अरेबियाची राजधानी रियादमध्ये असलेल्या संरक्षण मंत्रालयालवर बॅलिस्टिक मिसाईल टाकून हल्ला करण्यात आल्याची बातमी समोर येत आहे. या हल्ल्याची जबाबदारी येमेनच्या हुती गटाने घेतली आहे. हुती गटाचा प्रवक्ता याह्या सारीने दिलेल्या माहितीनुसार, 'आमच्या गटाने आमचा शत्रू असलेल्या सौदी अरेबिया देशाच्या राजधानीवर रियाधमध्ये संरक्षण मंत्रालयावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला केला आहे. हा हल्ला आम्ही थेट निशाण्यावरच केलेला आहे.' मंगळवारी सकाळी येमेनच्या हुती गटाने दोन क्षेपणास्त्रे टाकून अचानक सौदी अरेबियाच्या मंत्रालयावर हल्ला केला. सौदी अरेबियातील वृत्तसंस्था एएफपीच्या वृत्तानुसार, रियाधमध्ये मोठ्या स्फोटांचे आवाजही ऐकू आले.

हुती गटाने होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पश्चिमेला आखाताच्या किनाऱ्यावर असलेल्या सौदी अरेबियाच्या सर्वात मोठ्या तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि रास तानुराला लक्ष्य केल्याचा दावाही करण्यात आला आहे.

# शेतकरी मृत्यूप्रकरणी एसपी डॉ. नीलाभ रोहन यांनी स्थापन केली एसआयटी

## ४ आरोपीला पोलीस कोठडी, डीवायएसपी व्यंजने करणार तपास

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिंगोली गेट ब्रिजजवळील 'केएफ इंटरप्रायझेस' या फायनान्स कंपनीच्या कार्यालयात शेतकरी चंद्रकांत दगडूजी शिंदे (वय ४०, रा. माळकौठा, ता. मुदखेड) यांचा मृतदेह आढळून आला होता. या गंभीर घटनेच्या सखोल तपासासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे.



उपविभागीय पोलीस अधिकारी (नांदेड शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या नेतृत्वाखाली हे एसआयटी पथक तपास करणार असून, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव हे या पथकाच्या कामकाजाचा आढावा घेऊन मार्गदर्शन करणार आहेत. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल दुरपडे, बालाजी महाजन, पोलीस उपनिरीक्षक रमेश गायकवाड, पोलीस हवालदार श्याम पांचाळ, व्यंकट गांगुलवार, दिगंबर मुसळे, पोलिस अंमलदार भगवान गीते, भाऊसाहेब राठोड, तानाजी धूटे यांचा समावेश आहे.

मृत शेतकऱ्याची पत्नी ज्योती चंद्रकांत शिंदे (वय ३७) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी माळकौठा गावातील मारोती मंदिराजवळून दोन अनोळखी व्यक्तींनी चंद्रकांत शिंदे यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून नांदेड येथील 'केएफ इंटरप्रायझेस'च्या कार्यालयात आणले. तेथे दोन दिवस डांबून ठेवून त्यांना मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे.

या तक्रारीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३३/२०२६ कलम १०३(१), १४०(१), १४०(२), १४२, १२७(२) आणि ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा आणि वजिराबाद पोलिसांनी तातडीने कारवाई करत आतापर्यंत ४ जणांना अटक केली आहे. जयकुमार उर्फ भैय्या भगवान गायकवाड (वय २२, रा. सिडको, नांदेड), शेख आमेर शेख साहेबहुसेन (वय २५, रा. देगलूर नाका, नांदेड), इम्रान खान शाहेबाज खान **(पान ४ वर...)**

# महाराष्ट्र शासनाकडून एसटीसाठी ३९१ कोटींचा निधी मंजूर

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांच्या दिवाळीपूर्व वेतनाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. राज्य शासनाने एसटी कर्मचाऱ्यांच्या दिवाळीसाठी विशेष निधी मंजूर केला असून, यासाठी ३९१.०२ कोटी रुपयांचे वाटप करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे एसटी महामंडळातील सुमारे ८३ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची दिवाळी अत्यंत उत्साहात साजरी होणार आहे. त्यांचे प्रलंबित वेतन दिवाळीपूर्वीच मिळणार असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.









**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# पुस्तकांच्या आडून बंदुका?

जम्मू-काश्मीरमधील महाविद्यालये आणि ग्रंथालयांमधून 'देशद्रोही' आणि 'आक्षेपार्ह' ४,२४९ पुस्तके प्रसारातून हटवण्यात आल्याची माहिती सरकारने विधानसभेत दिली आहे. सरकारी आदेशानुसार औपचारिकरीत्या बंदी घातलेल्या १९ पुस्तकांच्या ५१८ प्रतीही हटवण्यात आल्या आहेत. ही आकडेवारी केवळ पुस्तकांच्या तपासणीची नाही; शिक्षणसंस्थांमध्ये कोणते साहित्य उपलब्ध असावे आणि त्यातून कोणते विचार रुजवले जातात, हा राष्ट्रीय सुरक्षेशी जोडलेला गंभीर प्रश्न आहे. ग्रंथालय हे ज्ञानाचे मुक्त दालन असते. तेथे विचारांची देवाणघेवाण, चिकित्सक दृष्टिकोन आणि विविध मतांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादे पुस्तक केवळ वेगळा विचार मांडते म्हणून त्याला 'आक्षेपार्ह' ठरवणे योग्य ठरणार नाही. मात्र, साहित्याच्या माध्यमातून हिंसाचाराचे समर्थन, दहशतवादी विचारसरणीचा प्रसार, भारताच्या सार्वभौमत्वाला आणि अखंडतेला बाधा आणणाऱ्या हिंसक कारवायांना प्रोत्साहन किंवा तरुणांना दहशतवादी संघटनांकडे आकर्षित करण्याचे प्रयत्न होत असतील, तर त्याकडे केवळ अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न म्हणून पाहता येणार नाही. जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील प्रदेशात या प्रश्नाचे गांभीर्य अधिक आहे. गेल्या अनेक दशकांपासून या प्रदेशाने दहशतवाद, हिंसाचार आणि त्यातून निर्माण झालेली सामाजिक अस्थिरता अनुभवली आहे. अशा परिस्थितीत शिक्षणसंस्थांचा वापर द्वेष, हिंसा किंवा दहशतवादी विचारांच्या प्रसारासाठी होऊ नये, यासाठी शासनाने सतर्क राहणे अपरिहार्य आहे. दहशतवादी कारवाया घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा त्या घडण्यापूर्वी त्यांची वैचारिक आणि संघटनात्मक पायाभरणी रोखणे अधिक महत्त्वाचे आहे. जम्मू आणि काश्मीर या क्षेत्रामध्ये पाकपुरस्कृत आणि नापाक विचाराच्या भारतीय लोकांकडून भारत विरोधी कार्यवाही सातत्याने चालूच असतात. आता त्यामध्ये संख्या कमी झाली असली तरी थांबलेली नाही, हे लक्षणीय म्हणावे लागेल. या दहशतवादी आणि भारत विरोधी कार्यांसाठी विविध क्षेत्रांचा वापर केला जातो. आता पुस्तकांच्या माध्यमातून तरुणांची डोकी भडकवण्याचे काम केले जात आहे असे दिसते. या सर्वांवर प्रतिबंधात्मक कारवाई नक्कीच केली गेली पाहिजे, पण असे करताना पारदर्शकता आणि स्पष्ट निकषही तितकेच आवश्यक आहेत. कोणते पुस्तक का हटवण्यात आले, त्यातील कोणता मजकूर कायद्याचे उल्लंघन करतो, त्याचा दहशतवादी किंवा हिंसक कारवायांशी नेमका संबंध काय, याची स्पष्ट नोंद असली पाहिजे. अशी पुस्तकं कोणी लिहिली, कोणी छापली आणि कोणी वितरित केली, यांच्यावर देखील कार्यवाही होणे तेवढेच गरजेचे आहे. हे तपासत असताना तपासणी करणाऱ्या समित्यांमध्ये विषयतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील जाणकारांचा समावेश असणे गरजेचे आहे. अन्यथा 'आक्षेपार्ह' या व्यापक शब्दाचा गैरवापर होऊन वैध शैक्षणिक साहित्यही संशयाच्या भोवऱ्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज दहशतवादाचे स्वरूपही बदलत आहे. बंदूक हातात घेण्यापूर्वी तरुणांच्या मनावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. ऑनलाइन प्रचार, सोशल मीडिया, बनावट माहिती, धार्मिक किंवा सामाजिक द्वेषाला खतपाणी घालणारे संदेश आणि हिंसक विचारसरणीचा प्रसार ही त्याची आधुनिक साधने आहेत. त्यामुळे केवळ महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची तपासणी करून काम भागणार नाही. दहशतवादी प्रचाराचे डिजिटल नेटवर्क, त्यामागील आर्थिक स्रोत, भरतीचे मार्ग आणि हिंसक कारवायांना आर्थिक आणि शारीरिक मदत करणाऱ्या संघटनात्मक साखळ्या शोधून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे. यासाठी केंद्र आणि जम्मू-काश्मीर प्रशासनाने गुप्तचर यंत्रणा, पोलीस, सायबर सुरक्षा विभाग आणि शिक्षण विभाग यांच्यात प्रभावी समन्वय असणे गरजेचे आहे. संशयास्पद ऑनलाईन प्रचाराची वेळेवर दखल, तरुणांना कट्टरतावादी विचारांकडे वळवण्याच्या प्रयत्नांची ओळख, बेकायदा निधीचा मागोवा आणि दहशतवादी संघटनांच्या संपर्कातील व्यक्तींवर कायद्यानुसार कारवाई या उपायांना अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्याचवेळी तरुणांना केवळ संशयाच्या नजरेने पाहणे हा उपाय नाही. शिक्षणसंस्थांमध्ये संविधान, लोकशाही, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि विविधतेचा आदर यांचे शिक्षण अधिक प्रभावीपणे दिले गेले पाहिजे. चुकीची माहिती ओळखण्याची क्षमता आणि डिजिटल माध्यमांचा जबाबदार वापर याबाबतही विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळाले पाहिजे. दहशतवादी विचारांना प्रतिबंध करण्यासाठी कायद्याची कठोरता जितकी आवश्यक आहे, तितकीच समाजाची वैचारिक प्रतिकारशक्ती वाढवणेही आवश्यक आहे. सरकारने २१ लाखांहून अधिक पुस्तकांची तपासणी सुरू केल्याचे सांगितले आहे. ही प्रक्रिया निष्पक्ष, कायदेशीर आणि पारदर्शक असली पाहिजे. राष्ट्रीय सुरक्षा आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांच्यातील संतुलन राखत हिंसाचाराला प्रोत्साहन देणाऱ्या साहित्याविरुद्ध निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे. दहशतवादाविरुद्धची लढाई केवळ सीमेवर किंवा बंदुकीच्या जोरावर जिंकता येत नाही. त्याची वैचारिक, आर्थिक, डिजिटल आणि संघटनात्मक मुळेही उखडावी लागतात. म्हणूनच शासनाने आता ठोस, समन्वित आणि कायदेशीर पावले उचलून दहशतवादी कार्यवाहीची पूर्वतयारीच निष्प्रभ करण्यावर भर दिला पाहिजे. देशाची एकता, अखंडता आणि नागरिकांची सुरक्षितता अबाधित ठेवताना ज्ञानाच्या दालनांचे स्वातंत्र्यही जपले गेले पाहिजे. हाच संतुलित मार्ग जम्मू-काश्मीरच्या देशातील इतर सर्व भागात शांतता आणि सुरक्षिततेसाठी अधिक परिणामकारक ठरू शकतो.

# विकासाभिमुख नेतृत्व : खा. अशोकराव चव्हाण



महाराष्ट्राचे लोकनेते, मराठवाड्याचे भूमिपुत्र, नांदेडच्या सर्वांगीण विकासाचे सारथी, राज्यसभेतील अभ्यासू खासदार अशोकराव चव्हाण यांचा वाढदिवस म्हणजे त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या जनतेचा आनंदोत्सव.

खा. अशोकराव चव्हाण यांचा वाढदिवस त्यांची कर्मभूमी असणाऱ्या नांदेड शहराबरोबरच मराठवाड्यात आणि सबंध महाराष्ट्रात मोठ्या हर्षोल्हासाने साजरा होत आहे. जनसामान्यात मोठी लोकप्रियता असणाऱ्या अशोकराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात, शैक्षणिक विकास, सहकार चळवळ, कला, क्रीडा, संगीत आणि सांस्कृतिक क्षेत्रात स्वत:ला कार्यरूपानी सिद्ध केले आहे.

भारताच्या राजकारणातील अत्युच्च मानदंड, जलक्रांतीचे जनक, नि:स्वार्थ कर्मयोगी डॉ. शंकरराव चव्हाण यांचा समृद्ध वारसा पुढे चालविण्याचे स्वप्न उरासी घेऊन वाटचाल करणारे ध्येयनिष्ठ नेते खा. अशोकराव चव्हाण हे महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य जनतेच्या हृदयसिंहासनावर कायमच विराजमान आहेत. सामाजिक बांधिलकी, समाजमनावरची पकड, धर्मनिरपेक्ष राजकारण हीच त्यांच्या राजकारणाची जमेची बाजू आहे. सर्वच जाती-धर्माच्या लोकांना योग्य ती संधी व न्याय देणारे नेते म्हणून त्यांच्याकडे मोठ्या आदराने पाहिले जाते.

देशभरात आणि राज्यात काहीही परिस्थिती असली, तरी नांदेडची जनता मात्र सदैव चव्हाण कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते, हे नांदेड शहर व जिल्ह्यात झालेल्या वेगवेगळ्या निवडणुकीत जनतेने दाखवून दिले आहे.

अशोकराव चव्हाण यांचा अभेद्य किल्ला म्हणून नांदेड जिल्ह्याची ओळख संबंध महाराष्ट्रात आणि देशात आहे.

नांदेड अशोकराव चव्हाणांचे आणि अशोकराव चव्हाण नांदेडचे हे सूत्र नांदेडवासीयांनी सबंध देशाला अनेक वेळा दाखवून दिले आहे. अशोकराव चव्हाणांचा अजिंक्य बालेकिल्ला म्हणजे नांदेड जिल्हा, अशी नांदेड जिल्ह्याची ओळख राहिली आहे.

राजकारण, समाजकारण, सहकार, शिक्षण, कला, संगीत, क्रीडा या साऱ्या क्षेत्रात चौफेर विकास करणारे नेतृत्व नांदेडकरांना लाभले, हे नांदेडकरांचे भाग्यच आहे. अशोकराव चव्हाण यांचे रचनात्मक आणि विकासात्मक स्वरूपाचे कार्य सर्वांच्याच नजरेत भरते.

शेतकरी, कष्टकरी माणूस सुखी व्हावा, त्यांच्या जीवनात चार सुखाचे घास यावे यासाठी अशोकराव चव्हाण यांनी भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना उभारला. आज मराठवाड्यात जे काही मोजके सहकारी पातळीवर चालणारे साखर कारखाने आहेत, त्यामध्ये भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना आणि त्यांचे दुसरे युनिट डोंगरकडा येथे उत्तमपणे कार्यरत आहे. सहकारी कारखाने मोडकळीस आणून ते परत खाजगी करायचे आणि मग ते खरेदी करायचे असा ट्रेंड महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दिसतो, पण अशोकराव चव्हाण यांनी मात्र कारखान्याचे दोन्ही युनिट हे सहकारी पातळीवरच ठेवले. याचाच अर्थ कारखान्याचे मालक हे शेतकरी सभासद आहेत. हे दोन्ही युनिट आज उत्तमपणे कार्यरत आहेत.

भाऊराव चव्हाण सहकारी कारखान्याला राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. लोकनेते खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उत्तुंग नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली विद्यमान अध्यक्ष नरेंद्र चव्हाण हे कारखान्याचा प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी प्रयत्नरत आहेत.

या कारखान्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनात नवी आर्थिक क्रांती आणली आहे. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून सातत्याने अशोकराव चव्हाण काम करतात, म्हणून तर नांदेडच्या जनतेचा विश्वास अशोकराव चव्हाण यांच्यावर कायम आहे. अशा दूरदृष्टीच्या विकासाभिमुख नेतृत्वाची नांदेड, मराठवाडा आणि महाराष्ट्राला गरज आहे.

जो लोग सफर की सुरुवात करते है,
वही मंजिल पा लेते है,
बस चलने का हौसला तो कीजिए,
अच्छे इन्सानो का तो रास्ते
भी इंतजार करते है!!

त्यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली नांदेड शहराचा सर्वदूर विकास होताना दिसतो आहे. गुरू-त्ता-गद्दीच्या माध्यमातून त्यांनी नांदेडचे रूपडे बदलले. नांदेड शहरातील विविध महामानवांच्या पुतळ्यांचे आकर्षक असे सुशोभीकरण खा. अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी झाले आहे.

अखिल विश्वाला वंदनीय ठरणारे स्वराज्य उभे करणाऱ्या कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे झालेले सुंदर सुशोभीकरण,भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे देखणे असे झालेले सुशोभीकरण, साहित्यरत्न, साहित्य शिरोमणी अण्णाभाऊ साठे यांच्या आकर्षक पुतळ्यांची झालेली स्थापना नांदेडचे ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वैभव वाढविणारे आहे. सामाजिक समतेचा झेंडा रोवणारे जगतज्योती महात्मा बसवेश्वर, सामाजिक समतेचे प्रतीक असणारे लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महान पराक्रमी योद्धे, वीर शिरोमणी महाराणा प्रताप, हरित क्रांतीचे प्रणेते, राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांचे भव्य पुतळे नांदेड शहरात उभारले आहेत.

जनकल्याणाचा आयुष्यभर वारसा नेटाने सांभाळणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा येत्या काही दिवसात नांदेड शहरात उभा राहणार आहे.

सर्व समावेशक विचारधारा जोपासण्याचं आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे महत्त्वपूर्ण काम खा. अशोकराव चव्हाण नेहमीच करत आले आहेत.

नांदेड शहराच्या कौठा परिसरामध्ये न्यायालयाच्या दोन अद्ययावत नवीन इमारती उभ्या राहत आहेत. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये नव्याने कॅन्सर रुग्णालय उभारले जात आहे. सदर रुग्णालय एल २ दर्जाचे असणार आहे. या ठिकाणी कॅन्सर रुग्णांसाठी लागणाऱ्या अत्याधुनिक सुविधा मोफत मिळणार आहेत. याचा फायदा जिल्ह्यातील व परिसरातील गरीब, गरजू रुग्णांना होणार आहे.

शहरालगतची गोदावरी नदीवर उभारलेले अनेक पुलं, शहरातील भव्य उड्डाणपुले, प्रशस्त रस्ते, सुंदर बगीचा आणि अत्यंत देखणे स्टेडियम आज शहरात उभे राहिले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम खा. अशोकराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्व आणि मार्गदर्शनातून साकारले आहे. भविष्यात रणजीसह आय.पी.एल. आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामने नांदेडमध्ये होतील. यामुळे उत्तमोत्तम अशा खेडाळूंचे दर्शन नांदेडरांना होईल यात शंका नाही. नांदेडमधून देखील नामांकित खेळाडू तयार होऊन नांदेडचे नाव देशपातळीवर चमकेल. नागपूर मुंबई समृद्धी महामार्गाला नांदेडची कनेक्टिव्हिटी दिल्याने आपला प्रवास कमी वेळात अधिक सुखकार होणार आहे. समृद्धी महामार्गाचे काम वेगाने सुरू आहे.

जगात जे जे सर्वोत्तम आहे, ते ते माझ्या नांदेडमध्ये झालेच पाहिजे हे अशोकराव चव्हाण यांनी पाहिलेले स्वप्न मूर्त स्वरूपात आल्यावाचून राहणार नाही.

नांदेड, मराठवाडा आणि सबंध महाराष्ट्राच्या विकासाचे स्वप्न घेऊन अहोरात्र काम करणाऱ्या अशोकराव चव्हाण यांच्याकडे आता केंद्रातील एक महत्त्वाची जबाबदारी यावी, अशी महाराष्ट्रातील तमाम शेतकरी, कष्टकऱ्यांची भावना आहे. ही जनतेची इच्छा येत्या काही दिवसात पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या हातून तमाम जनतेची सर्वोत्तम सेवा घडावी आणि त्यासाठी अशोकराव चव्हाण यांना निरोगी, दीर्घायू, आरोग्य लाभावे हीच विधात्याकडे विनम्र प्रार्थना!

**-प्रा. संतोष देवराये**
नांदेड
मो. ९८६०८२०६५७

# सह्याद्री वाचवा, महाराष्ट्राची ओळख जपवा!

सह्याद्री म्हणजे केवळ डोंगररांग नव्हे; तो महाराष्ट्राच्या अस्मितेचा, निसर्गवैभवाचा आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा जिवंत वारसा आहे. हिरव्यागार वनराईने नटलेले डोंगर, खोल दऱ्या, खळाळते झरे आणि जैवविविधतेने समृद्ध असलेला हा परिसर महाराष्ट्राच्या निसर्गसौंदर्याचे खरे वैभव आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली याच निसर्गसंपदेवर घाव घातले जात असतील, तर विकासाच्या संकल्पनेवरच आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे.

कर्जत तालुका आणि भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीबाबत वृक्षप्रेमींकडून व्यक्त होणारी चिंता ही केवळ झाडांच्या अस्तित्वापुरती मर्यादित नाही. हा प्रश्न आहे निसर्गाच्या संतुलनाचा, भावी पिढ्यांच्या सुरक्षिततेचा आणि महाराष्ट्राच्या पर्यावरणीय वारशाच्या संवर्धनाचा. त्यामुळे या परिसरातील वृक्षतोडीच्या तक्रारींची तातडीने निष्पक्ष चौकशी करून, अनावश्यक आणि बेकायदेशीर वृक्षतोड थांबविणे आवश्यक आहे.

विकास हवा; पण निसर्गाच्या विनाशाची किंमत मोजून नव्हे!आज रस्ते, इमारती, उद्योग आणि पायाभूत सुविधा या विकासाच्या गरजा आहेत. परंतु विकास म्हणजे केवळ सिमेंट-कॉंक्रीटच्या रचना उभारणे नव्हे. माणसाला जगण्यासाठी शुद्ध हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन आणि निसर्गाचे संतुलनही आवश्यक आहे. झाडे तोडून उभारलेले प्रकल्प विकासाचे प्रतीक ठरू शकतील; पण त्या विकासातून निसर्गाचे नुकसान होत असेल, तर त्याच्या दीर्घकालीन परिणामांचा विचार कोण करणार?



झाडे माती घट्ट धरून ठेवतात, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करतात, अनेक जीवांना निवारा देतात आणि वातावरणातील कार्बन शोषून हवामानाचे संतुलन राखण्यास हातभार लावतात.वृक्षतोडीमुळे या नैसर्गिक प्रक्रियांवर परिणाम होऊ शकतो. विशेषतः सह्याद्रीसारख्या संवेदनशील डोंगराळ प्रदेशात जंगलांचे नुकसान झाल्यास मृदा धूप, पाण्याच्या प्रवाहातील बदल आणि जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते.

भीमाशंकर हा परिसर धार्मिक श्रद्धेबरोबरच वनसंपदा आणि जैवविविधतेसाठीही महत्त्वाचा आहे. अशा परिसराचे जतन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती समाजाचीही सामूहिक बांधिलकी आहे.

आपल्या संतांनी आणि महापुरुषांनी निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी आपल्याला फार पूर्वीच दिली आहे.जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी वृक्षवल्लींना सोयरे मानून निसर्गाशी असलेले आपले आत्मीय नाते अधोरेखित केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वृक्षसंवर्धनविषयक धोरणांमधूनही निसर्गसंपदेबद्दलची जबाबदारी आणि दूरदृष्टी दिसून येते. या परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या महाराष्ट्रात झाडांकडे केवळ लाकूड किंवा अडथळा म्हणून पाहणे, ही आपल्या सांस्कृतिक मूल्यांशी विसंगत बाब ठरेल.

आज प्रश्न एवढाच आहे की, आपण संतांचे विचार आणि महापुरुषांचे आदर्श केवळ भाषणांत जपणार आहोत, की प्रत्यक्ष कृतीतूनही त्यांचे पालन करणार आहोत?

वृक्षतोडीला पर्याय शोधणे, प्रकल्पांचे पर्यावरणीय परिणाम गांभीर्याने तपासणे, आवश्यक त्या परवानग्यांची पारदर्शकता राखणे आणि तोडलेल्या झाडांच्या जागी केवळ औपचारिक वृक्षारोपण न करता जगणारी, स्थानिक प्रजातींची झाडे वाढविणे, ही काळाची गरज आहे. कारण एका जुन्या वृक्षाची जागा नव्याने लावलेले रोप तात्काळ घेऊ शकत नाही. जंगल ही केवळ झाडांची संख्या नसते; ती अनेक वर्षांत विकसित झालेली एक जिवंत परिसंस्था असते.

शासन, प्रशासन, विकासक आणि नागरिक यांनी एकत्र येऊन सह्याद्रीच्या संवर्धनासाठी ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे.पर्यावरणविषयक नियमांचे काटेकोर पालन, वृक्षतोडीच्या तक्रारींची त्वरित दखल आणि संवेदनशील क्षेत्रांमध्ये निसर्गाला कमीत कमी हानी पोहोचविणाऱ्या विकासाला प्राधान्य, या बाबींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.शेवटी, आपण पुढच्या पिढीला नेमका कोणता महाराष्ट्र देणार आहोत, हा प्रश्न स्वतःला विचारायला हवा. डोंगरांच्या जागी उजाड माळराने, आटणारे जलस्रोत आणि हरवलेली वनसंपदा, की हिरवाईने नटलेला, जैवविविधतेने समृद्ध आणि पर्यावरणीयदृष्ट्या सुरक्षित सह्याद्री?

सह्याद्री टिकला, तर त्याचे निसर्गवैभव टिकेल; निसर्ग टिकला, तरच मानवी जीवनाचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच कर्जत तालुका आणि भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून निसर्गाच्या रक्षणासाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत. विकासाच्या प्रत्येक निर्णयात पर्यावरणाचा विचार असला पाहिजे. कारण निसर्गाचे रक्षण करणे म्हणजे विकासाला विरोध करणे नव्हे, तर विकासाला शाश्वत भविष्य देणे होय.

सह्याद्री ही महाराष्ट्राची ओळख आहे. ती केवळ नकाशावर नव्हे, तर प्रत्यक्ष निसर्गात जिवंत राहिली पाहिजे. झाडे वाचविणे ही आजची गरज आहे आणि उद्याच्या पिढ्यांप्रती असलेले आपले नैतिक कर्तव्यही!

**-पंडित पवळे**
शिक्षणयोगी, नांदेड

# डिजिटल महाराष्ट्र, पण ग्रामीण नागरिकांची दमछाक!



आज महाराष्ट्र डिजिटल प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. सरकारी कार्यालयांपासून बँकिंग व्यवहारांपर्यंत, शिक्षणापासून आरोग्यसेवेपर्यंत आणि विविध शासकीय योजनांपासून प्रमाणपत्रांच्या अर्जापर्यंत सर्वत्र डिजिटल व्यवस्थेचा वापर वाढत आहे. कागदपत्रांचा वापर कमी करणे, वेळेची बचत करणे, पारदर्शकता वाढविणे आणि सरकारी सेवा नागरिकांपर्यंत सहज पोहोचविणे हा डिजिटल व्यवस्थेचा मुख्य उद्देश आहे. मात्र, या प्रगतीच्या चित्राची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. शहरांमध्ये डिजिटल सुविधा सहज उपलब्ध होत असताना ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना याच सुविधांचा लाभ घेण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, महाराष्ट्र डिजिटल होत असताना ग्रामीण नागरिकांची ही दमछाक कधी थांबणार? डिजिटल सेवा ही काळाची गरज आहे, यात शंका नाही.

पूर्वी सरकारी कार्यालयांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागत असत. डिजिटल व्यवस्थेमुळे हा त्रास कमी होण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र ऑनलाइन अर्ज कसा भरायचा, आवश्यक कागदपत्रे कशी जोडायची, संकेतस्थळावर नोंदणी कशी करायची आणि अर्जातील त्रुटी कशा दुरुस्त करायच्या, याची माहिती नसल्याने अनेक नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, अल्पशिक्षित व्यक्ती, शेतकरी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ही प्रक्रिया अधिक जिकिरीची ठरते.

एखाद्या शासकीय योजनेची अंतिम मुदत जवळ आली असेल, तर अशा तांत्रिक अडचणींचा आर्थिक आणि मानसिक त्रास अधिक वाढतो. डिजिटल सुविधा उपलब्ध असल्याचे कागदोपत्री दिसते; परंतु त्या प्रत्यक्षात सुरळीत चालतात का, याकडेही तितकेच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. याशिवाय, डिजिटल साक्षरतेचा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. मोबाईल हाताळता येणे म्हणजे सर्व ऑनलाइन सेवा वापरता येणे नव्हे. इंग्रजीतील सूचना, गुंतागुंतीचे अर्ज, तांत्रिक शब्द आणि वारंवार बदलणारी संकेतस्थळे यांमुळे अनेक नागरिक गोंधळून जातात. स्मार्टफोन नसणे, मोबाईलमधील मर्यादित माहिती साठवण क्षमता, इंटरनेटसाठी लागणारा खर्च आणि आवश्यक कागदपत्रांची डिजिटल प्रत उपलब्ध नसणे, या समस्याही आहेत. ग्रामीण नागरिकांना प्रत्येक कामासाठी महा-ई-सेवा केंद्र किंवा खासगी संगणक केंद्राचा आधार घ्यावा लागतो.

शेतकऱ्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक गंभीर आहे. पीकविमा, अनुदान, नुकसानभरपाई, ई-केवायसी, शेतकरी नोंदणी आणि विविध कृषी योजनांसाठी ऑनलाइन प्रक्रिया आवश्यक ठरत आहे. मात्र, अर्जातील छोटीशी चूक, आधार क्रमांकातील त्रुटी, बँक खात्याशी संबंधित अडचण किंवा तांत्रिक कारणामुळे अर्ज प्रलंबित राहू शकतो. अशा वेळी नेमकी चूक काय आहे आणि ती कुठे दुरुस्त करायची, याची स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक असते. शेतीच्या कामातून वेळ काढून शासकीय सेवा केंद्रांमध्ये जाणाऱ्या शेतकऱ्याला वारंवार हेलपाटे मारावे लागत असतील,

शासकीय कार्यालयांतील कामकाजापासून विविध दाखले, प्रमाणपत्रे, सातबारा उतारा, पीकविमा, शिष्यवृत्ती, पेन्शन आणि विविध शासकीय योजनांच्या लाभापर्यंत अनेक सेवा ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढावी, नागरिकांचा वेळ वाचावा आणि शासकीय कामकाज अधिक गतिमान व्हावे, हा त्यामागील उद्देश आहे. मात्र, या डिजिटल क्रांतीच्या झगमगाटात ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांची होणारी दमछाक दुर्लक्षित करून चालणार नाही. डिजिटल महाराष्ट्राची संकल्पना स्वागतार्ह असली, तरी तिचा लाभ ग्रामीण जनतेला सहज मिळतो का, हा खरा प्रश्न आहे. शहरांमध्ये इंटरनेट सुविधा, संगणक, स्मार्टफोन आणि डिजिटल व्यवहारांची माहिती सहज उपलब्ध होते. मात्र, ग्रामीण भागातील परिस्थिती वेगळी आहे. अनेक गावांमध्ये इंटरनेटची अनियमित सेवा, नेटवर्कच्या समस्या आणि तांत्रिक अडचणी नागरिकांच्या कामात अडथळे निर्माण करतात. एखादा ऑनलाइन अर्ज भरायचा असेल, शासकीय दाखला काढायचा असेल किंवा योजनेसाठी कागदपत्रे अपलोड करायची असतील, तर सामान्य नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतविशेषतः शेतकरी, शेतमजूर, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि अल्पशिक्षित नागरिकांना ऑनलाइन प्रक्रियेतील तांत्रिक बाबी समजून घेणे कठीण जाते. परिणामी, स्वतःचे काम स्वतः करण्याऐवजी त्यांना सेवा केंद्रे, सायबर कॅफे किंवा खासगी एजंटांची मदत घ्यावी लागते. यासाठी वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होतात. ऑनलाइन कामकाजामुळे सरकारी कार्यालयांच्या फेऱ्या कमी होतील, अशी अपेक्षा होती; परंतु अनेकदा एका छोट्याशा कामासाठीही वारंवार हेलपाटे मारावे लागतात.

मात्र, नेटवर्क नसणे, संकेतस्थळे बंद पडणे, अर्जातील तांत्रिक त्रुटी आणि कागदपत्रांमधील विसंगती यामुळे शेतकऱ्यांना अनेकदा मनस्ताप सहन करावा लागतशेतकऱ्याला शेतीची कामे सोडून ऑनलाइन अर्जासाठी सेवा केंद्रावर जावे लागते. एखादी मुदत जवळ आली की गर्दी वाढते आणि काम वेळेत पूर्ण होईल की नाही, याची चिंता सतावते. तांत्रिक अडचणींमुळे अर्ज भरता आला नाही, तर त्याची जबाबदारी शेतकऱ्यावरच येते. ही परिस्थिती बदलण्यासाठी डिजिटल सुविधा निर्माण करण्याबरोबरच त्या विश्वासार्ह आणि शेतकऱ्यांसाठी सुलभ करणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, ओटीपीचा वापर करणे किंवा डिजिटल पेमेंट करणे याबाबत पुरेशी माहिती नसते. काही नागरिकांना सायबर फसवणुकीची भीती वाटते, तर काहींना चुकीचा पर्याय निवडल्यास आपले नुकसान होईल, अशी चिंता असते. डिजिटल साक्षरतेचा अभाव असताना केवळ ऑनलाइन सेवा सुरू केल्याने प्रशासनाचे काम सोपे होईल; परंतु नागरिकांची अडचण कायम राहू शकते. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर डिजिटल साक्षरता शिबिरे आयोजित करणे, नागरिकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे आणि ऑनलाइन सेवांचा वापर शिकवणे गरजेचे आहे.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती आणि तंत्रज्ञानाची सवय नसलेल्या नागरिकांसाठी स्वतंत्र मदत व्यवस्था असावी. डिजिटल तंत्रज्ञान हे सामान्य माणसाच्या मदतीसाठी आहे, त्याला अडचणीत टाकण्यासाठी नाही, याचे भान प्रशासनाने ठेवले पाहिजडिजिटल महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी केवळ ऑनलाइन पोर्टल सुरू करणे पुरेसे नाही. त्यासाठी ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधा सक्षम करणे, संकेतस्थळे वेगवान आणि वापरण्यास सोपी बनवणे, सर्व्हरमधील अडचणी कमी करणे आणि तांत्रिक मदत वेळेत उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पर्यायांची उपलब्धता ठेवणेही आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर वाढवताना प्रत्यक्ष मदतीची गरज असलेल्या नागरिकांना प्रशासनापासून दूर लोटता कामा नये. शेवटी, विकासाच्या नावाखाली नागरिकांची दमछाक होणार असेल, तर त्या विकासाच्या स्वरूपाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. डिजिटल महाराष्ट्र उभारताना ग्रामीण जनतेच्या अडचणी केंद्रस्थानी ठेवल्या पाहिजेत. तंत्रज्ञान माणसासाठी आहे, माणूस तंत्रज्ञानासाठी नाही, हे प्रशासनाने लक्षात ठेवले पाहिजे. ग्रामीण नागरिकांच्या हातात डिजिटल सुविधा आणि त्यांच्या पाठीशी सक्षम प्रशासन उभे राहिले, तरच खऱ्या अर्थाने डिजिटल महाराष्ट्र साकार होईल!

**-प्रा. संजय बडे**
दहेगाव ता. वैजापूर, जि. छ. संभाजी नगर
मो.७८८८२९७८५९


लोकनेते,
माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार
मा. अशोकरावजी चव्हाण साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक:
सौ. वैशाली प्रविण देशमुख
(नगराध्यक्षा, नगरपंचायत अर्धापूर)


साहेबांना
वाढदिवसा निमित्त व
दीपावलीच्या सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा!
: शुभेच्छुक :
निळकंठ मदने पार्डीकर
संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, नांदेड
जिल्हाध्यक्ष, सरपंच संघटना, नांदेड


लोकनेते, माजी मुख्यमंत्री तथा खासदार
मा.श्री.अशोकरावजी
चव्हाण साहेब
यांना वाढदिवसानिमीत्त हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक :- मुसवीर खतीब
माजी उपनगराध्यक्ष तथा
नगरसेवक नगरपंचायत, अर्धापूर


लोकनेते, माजी मुख्यमंत्री तथा खासदार
मा.श्री.अशोकरावजी
चव्हाण साहेब
यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा..!
शुभेच्छुक :- जनकराव वानखेडे पाटील मेढलेकर ता.अर्धापूर


माजी मुख्यमंत्री तथा खासदार
मा.श्री.अशोकरावजी
चव्हाण साहेब
यांना
वाढदिवसानिमीत्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक :- गाजी काजी
नगरसेवक नगरपंचायत, अर्धापूर


लोकनेते,
माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार
मा. अशोकरावजी चव्हाण साहेब
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
अभिदादा गुरखेल
•भाजपा युवा नेते, अर्धापूर

# टीम इंडियाचा एकहाती विजय, न्यूझीलंडविरुद्धची टी २० मालिका जिंकली!

## ● अभिषेक शर्माचं तुफानी शतक ● १९९ धावांचं लक्ष्य १३ षटकातच गाठलं



**नवीदिल्ली (वृत्तसंस्था)** –भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात अभिषेक शर्माने असा काही तडाखा दिला की न्यूझीलंडच्या गोलंदाजांना मैदानावर सावरण्याची संधीही मिळाली नाही. अभिषेक शर्मा याने आपल्या आक्रमक फलंदाजीने किवी गोलंदाजांची अक्षरशः पिसं काढली. अभिषेकने चौफेर फटकेबाजी करत अवघ्या ३८ चेंडूंत ११३ धावांची वादळी खेळी साकारली. त्याच्या या स्फोटक शतकाच्या जोरावर भारताने न्यूझीलंडने दिलेल्या १९९ धावांच्या लक्ष्याचा अवघ्या १३ षटकांत यशस्वी पाठलाग केला आणि तब्बल ६ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० अशी विजयी आघाडी घेत मालिका आपल्या नावावर केली.

नाणेफेक गमावल्या-नंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. टीम सेफर्ट अवघ्या २ धावांवर बाद झाला. मात्र, फिन ॲलनने २५ चेंडूंत ४० धावांची आक्रमक खेळी करत संघाचा डाव सावरला. यानंतर डॅरिल मिचेलने भारतीय गोलंदाजांवर हल्ला चढवला. त्याने ५२ चेंडूंत नाबाद ८९ धावा केल्या. या खेळीत त्याने ५ चौकार आणि ५ षटकार ठोकले. ग्लेन फिलिप्सने १४ चेंडूंत १७ धावा केल्या, तर बेव्हन जेकब्सने २३ चेंडूंत नाबाद ३९ धावा करत मिचेलला चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांमध्ये अर्शदीप सिंह, अक्षर पटेल आणि नितीश कुमार रेड्डी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. न्यूझीलंडने २० षटकांत ३ बाद १९८ धावा करत भारतासमोर १९९ धावांचे लक्ष्य ठेवले.

१९९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने आक्रमक सुरुवात केली. वैभव सूर्यवंशी आणि अभिषेक शर्मा यांनी न्यूझीलंडच्या गोलंदाजांना कोणतीही संधी दिली नाही. वैभवने अवघ्या १९ चेंडूंत ४५ धावा कुटल्या. त्याने ४ चौकार आणि ४ षटकार मारले. मात्र, मिचेलच्या गोलंदाजीवर तो बाद झाला. दुसऱ्या बाजूला अभिषेक शर्माने धावांचा धडाका सुरूच ठेवला. त्याने अवघ्या ३८ चेंडूंत ११३ धावांची तुफानी खेळी केली. त्याच्या खेळीत ९ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. त्याचा स्ट्राइक रेट तब्बल २९७.३६ इतका राहिला. अभिषेकने चौफेर फटकेबाजी करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना अक्षरशः जेरीस आणले. १० व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर जेव्हा अभिषेक बाद झाला, तेव्हा भारताची धावसंख्या १७८ होती. त्यानंतर धावांचा वेग मंदावला आणि अखेरीस संघाने १३.२ व्या षटकात विजयाचे लक्ष्य गाठले.

पान १ वरून...

**शेतकरी मृत्यूप्रकरणी...**

(वय ४०, रा. गोवर्धन घाट, नांदेड) या तिघांना दि. २५ ऑक्टोबर रोजी तर शेख मुदशीर शेख खदीर (वय २४, रा. पीरबुऱ्हाण नगर, नांदेड) यास दि. २६ ऑक्टोबर रोजी अटक करून न्यायालयात हजर केले. यातील मुख्य आरोपी केएफ फायनान्सचा संचालक अजूनही फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले. वरील सर्व आरोपींना दि. २९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी (पीसीआर) मध्ये पाठविण्यात आले आहे. पुढील तपास एसआयटी प्रमुख रामेश्वर व्यंजने करीत आहेत.

दरम्यान, कर्जवसुली किंवा फायनान्स कंपनीकडून बेकायदेशीर त्रास, धमकी किंवा दबाव येत असल्यास घाबरून टोकाचे पाऊल उचलू नका, तातडीने जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधा किंवा ११२ वर कॉल करा. तक्रारीवर कठोर कारवाई केली जाईल, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते ३ नोव्हेंबरला होणार हिंजवडी मेट्रोचे उद्‌घाटन

## मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार

**पुणे(प्रतिनिधी)–** पुण्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.३ किलोमीटरच्या मेट्रो मार्गिकेचे उद्‌घाटन ३ नोव्हेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑनलाईन (व्हर्च्युअल) पद्धतीने करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या उद्‌घाटनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

मेट्रोच्या या मार्गावरील २३ पैकी १७ स्टेशन्स उद्‌घाटनासाठी तयार आहेत, तर ६ स्टेशनचे काम अद्याप सुरू आहे. मेट्रोची ही मार्गिका सुरू झाल्याने हिंजवडी आयटी पार्क परिसरातून पुण्याच्या मध्यवर्ती भागात मेट्रोने प्रवास करता येणार आहे. या मेट्रो मार्गिकेचे उद्‌घाटन याआधी अनेकदा पुढे ढकलण्यात आले होते. पीएमआरडीएकडून पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशीपच्या (सार्वजनिक-खासगी भागीदारीत) माध्यमातून ही मेट्रो मार्गिका उभारण्यात आली आहे. ३ तारखेला होणाऱ्या कार्यक्रमात पुण्यातील मेट्रोच्या आणखी दोन टप्प्यांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे.

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिका क्रमांक तीनचे उद्‌घाटन ३ नोव्हेंबरला करण्याचे निश्चित झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रस्तावित पुणे दौरा पुढे ढकलला असला, तरी मेट्रोचे उद्‌घाटन त्यांच्या हस्ते ऑनलाईन (व्हर्च्युअल) पद्धतीने करण्याचे नियोजन सुरू आहे. उद्‌घाटनाचा सोहळा बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात होणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री प्रत्यक्ष उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळाली. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून सार्वजनिक-खासगी भागीदारीत माण-हिंजवडी-शिवाजीनगर या सुमारे २३ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिकेचे काम करण्यात येत आहे. माहिती तंत्रज्ञाननगरी हिंजवडी आणि पुणे शहराला जोडणाऱ्या या मार्गिकेवरील प्रवासी सेवा सुरू होण्याची नागरिकांना प्रतीक्षा आहे. या मार्गिकेवरील बहुतांश कामे पूर्णत्वाकडे असून, प्रवासी सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रक्रिया राबविण्यात येत आहेत.

मेट्रोच्या उद्घाटनासाठी यापूर्वी काही तारखा चर्चेत आल्या होत्या. विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे कार्यक्रम लांबणीवर पडला होता. आता ३ नोव्हेंबरला कार्यक्रम आयोजित करण्याच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. पंतप्रधान मोदींचा पुणे दौरा पुढे ढकलल्याने कार्यक्रम लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र, पंतप्रधान व्हर्च्युअल पद्धतीने कार्यक्रमात सहभागी होणार असल्याने नियोजित तारखेलाच उद्‌घाटन होण्याची शक्यता आहे.

---

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना सूचित करण्यात येते की, माझ्या पक्षकारानी दिलेल्या माहिती व अधिकारानुसार मौजे खुपसरवाडी ता. जि. नांदेड येथील शेत गट क्र. १५१, एकूण क्षेत्रफळ २० हेक्टर ६५. आर, आकार रु २.३२ यापैकी श्री. दिलीपकुमार रामेश्वर डॉ. शिवाल यांच्या मालकीचे ०० हेक्टर ३३ आर माझ्या पक्षकारांना पक्षकारांसोबत विक्री करण्याचा ठराव केलेला असून, त्या करारापोटी माझ्या पक्षकाराकडून इसारा/अग्रिम रक्कम स्वीकारलेली आहे. सदर जमिनीचे गट एकमेकांना लागून असल्याने त्यांची एकत्रित चतुः सीमा खालीलप्रमाणे असून ती दोन तुकड्यामध्ये आहे.

**१.१६ आर – चतुःसीमा**

पूर्वेसः शेख जुबेर शेख इसरार यांचे शेल आहे.

पश्चिमेस-गाव पाणंद आहे.

दक्षिणेसः बालाजी बबनराव पावडे यांचे सेत आहे

उत्तरेसः शेख युनूस शेख शब्बीर यांचे शेत आहे

**२१७ आर चतःसीना**

पूर्वस-सरकारी ताला आहे.

पश्चिमेस-शेख युनुसशेख शब्बीर यांची जमीन आहे.

दक्षिणेस-शेख जुबेर सेख इसरार याची अभीन आहे.

उत्तरेस-उमाजी पावडे यांची जमीन आहे.

तरी सर्व जनतेस व संबंधितांना सूचित करण्यात येते की, वरील मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हरकत आक्षेप असतील, किंवा मिळकतीवर कोणाचेही मालकी हक्क, अधिकार, अतिक्रमणवाद वारसाहक्क असतील किंवा वरील मिळकतीवर शासकीय/खाजगी बँक, सोसायटी, कर, कर्ज, बोजा असतील किंवा वरील मिळकतीवर कोणत्याही प्रकारच्या करारामध्ये विक्री, गहाण, हस्तांतर अदलाबदल, दान, बक्षीस अंतर्गत बोजाखाली असेल, तर हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत आपले हरकत, आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह माझ्या कार्यालयात लेखी नोंदवावेत. मुदतीत हरकत, आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील व्यवहार पूर्ण करतील

दिनांक २७/१०/२०२६

मार्फत
ॲड. बी. आर. भोसले
जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
मो.९४२२१७०५७८

## पासपोर्ट हरवला

माझा मीर उस्मान अली पि. मीर सिराज अली या नावाचा पासपोर्ट माणिक पेट्रोलपंप ग्यानमाता या रोड प्रवासात हरवला आहे. ज्यांना कोणाला सापडला असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**–मीर उस्मान अली पि. मीर सिराज अली
गल्ली नं. १०, पीर बुऱ्हाननगर, नांदेड
मो. ९४२२१८९१९५

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २३६ / २०२६

अर्जदार : १. विमल भ्र. गणपती तोटलवार वय ६५ वर्षे, धंदा -- ०२. राजू पि. गणपती तोटलवार, वय ४० वर्षे, धंदा ०३. संजय पि. गणपती तोटलवार वय ३७ वर्षे, धंदा मजुरी, सर्व रा. छोट्टी गल्ली बिलोली ता. बिलोली जि.नांदेड

विरुध्द. निरंक .

विषय – वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत गणपती . मोगलाजी तोटलवार यांची अर्जदार क्र ०१ ही पत्नी असून अर्जदार क्र २ ते ३ हे त्यांचे अपत्ये आहेत. मयत गणपती पि. मोगलाजी तोटलवार हे छोट्टी गल्ली बिलोली ता.बिलोली जि.नांदेड येथील रहिवासी होते त्यांच्या मृत्यू दिनांक ३१/०३/२०२३ रोजी छोट्टी गल्ली बिलोली येथे झाला. अर्जदार हयांना मयत गणपती पि. मोगलाजी तोटलवार यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत गणपती पि. मोगलाजी तोटलवार यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत गणपती पि. मोगलाजी तोटलवार यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेलं अगर सदर मयत गणपती पि. मोगलाजी तोटलवार यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत गणपती पि. मोगलाजी तोटलवार यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर गणपती पि. मोगलाजी तोटलवार यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,

| | |
|---|---|
| क. लिपीक | सहा. अधिक्षक |
| दिवाणी न्यायालय व. स्तर., | दिवाणी न्यायालय व. स्तर., |
| बिलोली | बिलोली |

**JT. CIVIL JUDGE J.D. J.M.F.C. BHOKAR**
**IN THE COURT OF SHRI. RAVI SHIVAJIRAO IRLE**
**JOINT CIVIL JUDGE J.D. BHOKAR, BHOKAR, NANDED.**
**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R. 1, 5.)**

TO,
VARSHA D/O RAMA FULE
R.C.S./108/2025

ANAND MHESAJI FULE THROUGH SAHEBRAO DATTA FULE VS RAMA S/O VITTHAL FULE NEXT DATE: 25-11-2026

R/O BORGAON (KIWALA) TQ. LOHA DIST. NANDED.

WHEREAS ANAND MHESAJI FULE THROUGH SAHEBRAO DATTA FULE HAS INSTITUTED A SUIT AGAINST YOU FOR YOU ARE HEREBY SUMMONED TO APPEAR IN THIS COURT IN PERSON, OR BY A PLEADER DULY INSTRUCTED, AND ABLE TO ANSWER ALL MATERIAL QUESTIONS RELATING TO THE SUIT, OR WHO SHALL BE ACCOMPANIED BY SOME PERSONS ABLE TO ANSWER ALL SUCH QUESTIONS, ON THE 25-11-2026 AT 11:00 O'CLOCK IN THE FORENOON, TO ANSWER THE CLAIM; AND FURTHER YOU ARE HEREBY DIRECTED TO FILE ON THAT DAY A WRITTEN STATEMENT OF YOUR DEFENCE AND TO PRODUCE ON THE SAID DAY ALL DOCUMENTS IN YOUR POSSESSION OR POWER UPON WHICH YOU BASE YOUR DEFENCE OR CLAIM FOR SET-OFF OR COUNTER-CLAIM, AND WHERE YOU RELY ON ANY OTHER DOCUMENT WHETHER IN YOUR POSSESSION OR POWER OR NOT, AS EVIDENCE IN SUPPORT OF YOUR DEFENCE OR CLAIM FOR SET- OFF OR COUNTER-CLAIM, YOU SHALL ENTER SUCH DOCUMENTS IN A LIST TO BE ANNEXED TO THE WRITTEN STATEMENT. TAKE NOTICE THAT, IN DEFAULT OF YOUR APPEARANCE ON THE DAY BEFORE MENTIONED, THE SUIT WILL BE HEARD AND DETERMINED IN YOUR ABSENCE.

GIVEN UNDER MY HAND AND THE SEAL OF THE COURT, THIS 15-10-2026

JOINT CIVIL JUDGE
J.D. BHOKAR

## Change In Name

**I, RAJJAK SHAIKH WAJIR KURESHI (OLD NAME), R/O H.NO. 280/1098. NAVI ABADI BURUD GALLI TQ. BILOLI DIST NANDED, STATE MAHARASHTRA PIN CODE 431710, HAVE TO CHANGE NAME KURESHI (SURNAME) RAJJAK (GIVEN NAME) AND S/O KURESHI (FATHERS SURNAME) (FATHER GIVEN NAME) SHAIKH WAJIR ( NEW NAME) FOR ALL FUTURE PURPOSES.**

## जाहीर प्रगटन

दिड येथील ५वे सह दिवाणी न्यायाचीश क.स्तर,नदिड
यांच्या न्यायालयात
समय पी. ए.
किरकोळ दिवाणी अर्ज क. १५६७/२०२६
प्रीती व इतर वि. निरंक

अर्जदार-ती पि. भगवानदास काबरा ज
गैरकानेदार :
पोती . वलकिशोर सारडा,
वय : ३७ वर्षे चंदा : घरकाम,
रा. २०-१-५०२, गोरला खिडकी, कबुतर खाना, बहादुरपुरा, हैद्राबाद, तेलंगाणा.

निरंक
विरुद्ध

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत भगवानदास जगन्नाथ काबरा यांचे वारस आहेत. मयत भगवानदास जगन्नाथ काबरा यांचा दिनांक ११/०९/१९९९ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार ही मयताची मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत: हजर राहून या न्यायालयात दिनांक २७/११/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणा-या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल,

आज दिनांक २२.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयाने दिला.

आदेशावरून

| | |
|---|---|
| कनिष्ठ लिपिक, | सहा. अधिक्षक, |

५ वे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, नांदेड.

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १६४/ २०२६

सदानंद वि. ग्रामसेवक, ग्रामपंचायत दुगाव.

अर्जदार-सदानंद पि. बाबुराव पुयड वय- १९ वर्षे, धंदा- शिक्षण, दोघे रा. दुगाव, ता. बिलोली जि. नांदेड

विरुध्द

ग्रामसेवक ग्रा.पं. कार्यालय दुगाव,
ता. बिलोली. जि. नांदेड

गैरअर्जदार

जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३ (३) व सुधारीत अधिनियम ३ (अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म / मृत्यूची नोंद सुधारणा कायदा २०२६, कलम ३ (अ) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असुन अर्जदाराच्या जन्माची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदाराचा नामे सदानंद पि. बाबुराव पुयड यांचा जन्म दिनांक १९/०५/२००८, राहणार दुगाव, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने जन्माची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्माची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे.

पुढील सुनावणीची तारीख २१-११-२०२६ रोजी ठेवण्यात आली.

आज दिनांक १४ -१०-२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी न्यायालय बिलोली.

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील मा. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय बिलोली.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १६३ / २०२६

मंगेश पि. केशव पुयड वय - १६ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क. वडील केशव पि. विठ्ठल पुयड, वय ४८ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. दुगाव, ता. बिलोली जि. नांदेड

विरुध्द

मंगेश वि. ग्रामसेवक, ग्रामपंचायत दुगाव.

अर्जदार-ग्रामसेवक ग्रा.पं. कार्यालय दुगाव, ता. बिलोली, जि. नांदेड

मागणी

गैरअर्जदार-जन्म/मृत्यू नोंदणी कायदा १९६९, कलम १३ (३) व सुधारीत अधिनियम ३ (अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी जन्म/मृत्यूची नोंद सुधारणा कायदा २०२६, कलम ३ (अ) प्रमाणे या न्यायालयात दाखल केला असुन अर्जदाराच्या जन्माची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेश करण्यात यावा म्हणुन या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी अर्जदाराचा नामे मंगेश पि. केशव पुयड यांचा जन्म दिनांक १८/१०/२००८, राहणार दुगाव, ता. बिलोली, जि. नांदेड येथे झाला असुन अर्जदाराने जन्माची नोंद घेण्यास गैरअर्जदारास कळविले नसल्याने सदरची नोंद होऊ शकली नसल्याने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदारास वरील आदेश देण्याकरिता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास ३० दिवसांचे आत वरील न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्माची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन दिले आहे. पुढील सुनावणीची तारीख २१-११-२०२६ रोजी ठेवण्यात आली. आज दिनांक १४-१०-२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

सहा अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्र. श्रेणी न्यायालय बिलोली

## Change In Name

**MY OLD NAME: SYED SAJID ALI WHICH NOW I AM CHANGING AS NEW NAME: SAYYAD SAJID ALI SAYYAD SABER ALI HENCE FORTH, MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE CONSIDER THE SAME. ADDRESS: H.NO. 2-5-268/2 DULESHAH RAHEMAN NAGAR, NEAR SADIK KIRANA SHOP, POST. VAZIRABAD, NANDED. NANDED-431601. STATE - MAHARASHTRA**

**MOB: 9527866312**

## Change In Name

My Old Name is **HATTEKAR VIJAY DATTATRYA** Now I am Changing as a New Name **VIJAY DATTATRAY HATTEKAR. PLACE OF BIRTH:- PANGRI,NANDED, MAHARASHTRA** Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. **Address - BAYNAYI NIWAS P NO 46 MALTEKDI ROAD MADHASSWAD E, PHASE NO 1 MAHALJA NANDED, NANDED, 431605, MAHARASHTRA, INDIA**

## Change In Name

**MY OLD NAME IS SHIREEN FATEMA NISHAD QUADRI NOW I AM CHANGING AS A NEW NAME SHIREEN FATIMA QUADRI HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE KINDLY CONSIDER THE SAME .FULL ADDRESS H.NO.2-11-371, NEAR KARDILE HOSPITAL GOVERDHAN GHAT ROAD VAZIRABAD NANDED MS 431601. MOB.NO.8983787947.**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMAD YOUSUF** Now I am Changing as a New Name **MOHD YOUSUF ASHFAQ MOHD YOUNUS** Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. **Address - H. NO. 1-16-225 SUNDAR NAGAR NEAR AZIZ KIRANA STORE TARODA BK NANDED-431605**

**MO. NO. 9730606411**

## Change In Name

**MY OLD NAME IS. ABDUL SATTER SHAIKH AHMED.NOW I AM CHANGING AS A NEW NAME SYED MUJEEB .HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME. FULL ADDRESS. HYDERBAGH NO 2, NEAR IQRA SCHHOOL POST ITWARA DEGLOOR NAKA NANDED M.S.431604.**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED SHAHNAWAZMOHAMMADNAZEER.**Now I am Changing as a New Name **MOHAMMED SHAHNAWAZ** Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same. **Address - H. NO. 9-5-1129 PAKIZA NAGAR, DEGLOOR NAKA IDGAH ITWARA, NANDED-431604**

**MO. NO. 8421360268**

## नाव बदलल्याची जाहीर नोटीस

मी पवन संजयराव पवार (आधार कार्डप्रमाणे नवीन नाव), पत्ता: मु. पोस्ट निवघा तालुका मुदखेड जिल्हा नांदेड, याद्वारे जाहीर करतो की, माझ्या जुन्या शैक्षणिक रेकॉर्ड व मार्कशीटवर माझे जुने नाव पवन संजय पवार असे नमूद आहे. मी माझे जुने नाव बदलून आता पवन संजयराव पवार असे नवीन नाव धारण केले आहे. भविष्यात मला याच पवन संजयराव पवार या नवीन नावाने ओळखले व संबोधले जावे.

स्वाक्षरी/
नाव: पवन संजयराव पवार


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

# ध्येय निश्चित करा, सातत्यपूर्ण परिश्रमातून यश मिळवा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## सार्वजनिक प्रशासन व राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांशी साधला संवाद



**नांदेड (प्रतिनिधी) –** विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यातील ध्येयांचे स्पष्ट निर्धारण करून सातत्यपूर्ण परिश्रम, शिस्त, स्व-अभ्यास आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर यश संपादन करावे. केवळ नोकरी मिळविण्यापुरते मर्यादित न राहता समाजपरिवर्तनात सक्रिय योगदान देणारे जबाबदार नागरिक म्हणून स्वत:ला घडवावे, असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या १२० तासांच्या प्रत्यक्ष कार्यानुभव प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने सार्वजनिक प्रशासन व राज्यशास्त्र विषयाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांशी जिल्हाधिकारी कर्डिले यांनी संवाद साधला. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील ध्येय-आकांक्षा जाणून घेत त्यांच्या करिअरविषयक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी भविष्यात कोणत्या क्षेत्रात करिअर घडवायचे आहे, त्यासाठी कोणती तयारी सुरू आहे आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे, याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्तपणे संवाद साधला. विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवा, राजकारण, कायदा, अध्यापन, संशोधन, सामाजिक विकास आणि विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून समाजसेवा करण्याची इच्छा व्यक्त केली.

यावेळी ध्येय निश्चिती, वेळेचे प्रभावी व्यवस्थापन, नियमित वाचन, संवादकौशल्य, नेतृत्त्वगुण आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी सातत्य, शिस्त आणि स्व-अभ्यासाला पर्याय नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

वादादरम्यान विद्यार्थ्यांनी प्रशासकीय कामकाज, शासकीय योजना, सार्वजनिक धोरणे, स्पर्धा परीक्षांची तयारी, करिअर विकास आणि लोकाभिमुख प्रशासन यांसंबंधी विविध प्रश्न विचारले. जिल्हाधिकारी कर्डिले यांनी या प्रश्नांना उत्तरे देत प्रशासनाची कार्यपद्धती, लोकसेवेतील संधी आणि जबाबदाऱ्या यांची माहिती दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत राबविण्यात येणारा १२० तासांचा प्रत्यक्ष कार्यानुभव प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांना प्रशासनाची प्रत्यक्ष ओळख करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या माध्यमातून कार्यालयीन कार्यपद्धती, विविध शासकीय विभागांचे कामकाज, योजनांची अंमलबजावणी, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा आणि निर्णयप्रक्रियेचे विविध पैलू समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते, असे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, समस्या निराकरण, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि व्यावसायिक कार्यसंस्कृती विकसित होण्यास मदत होईल. शैक्षणिक ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्याने विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढण्याबरोबरच त्यांच्यात सामाजिक जबाबदारीची जाणीवही निर्माण होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी कर्डिले यांनी व्यक्त केला.

# लोकसंपर्क आणि अभिव्यक्तीमधील सातत्य भाषिक व्यक्तिमत्त्वासाठी गरजेचे -डॉ. महेश जोशी

## भाषा संकुलात इंडक्शन कार्यक्रमाचे आयोजन



**नांदेड (प्रतिनिधी)–** आजूबाजूला वावरणाऱ्या निरनिराळ्या समूह गटातील लोकांशी असणारा संवाद संपर्क आणि भाषिक अभिव्यक्तीमध्ये असणारे सातत्य यामुळे व्यावसायिक व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो, असे प्रतिपादन डॉ. महेश जोशी यांनी भाषा, वाङ्मय व संस्कृती संकुलात आयोजित 'इंडक्शन' कार्यक्रमात केले. '२१ व्या शतकातील भाषा आधारित करिअरसाठी कौशल्य विकास' या विषयावर डॉ. जोशी यांनी बीजवक्तव्य दिले.

पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी मिळवण्यासाठी मार्गदर्शनपर 'इंडक्शन' कार्यक्रमाचे आयोजन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली भाषा संकुलात करण्यात आले. फ्रेंच भाषाप्रमुख डॉ. नीना गोगटे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले.

स्पॅनिश भाषा प्रमुख प्रा. झिशान अली (शिकणे - यशस्वी शैक्षणिक प्रवासाचे नियोजन), डॉ. पी. विठ्ठल (मराठी भाषेतील करिअर), डॉ. योगिनी सातारकर (मानव्यविज्ञान क्षेत्रातील संधी), डॉ. दिलीप चव्हाण (संशोधनातील अंतरविद्याशाखीय दृष्टिकोन), डॉ. वैजनाथ अनमुलवाड (भाषेचा क्षेत्रीय अभ्यास), डॉ. शैलजा वाडीकर (परीक्षा आणि मूल्यमापन), डॉ. नीना गोगटे (विद्यार्थी सहाय्य आणि सुविधा), लक्ष्मण जाधव (प्रशासकीय प्रक्रिया व कालमर्यादा) यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

'कॉक्सिट' महा-विद्यालयाच्या अभ्यास मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. शैलजा वाडीकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पृथ्वीराज तौर यांनी तर सूत्रसंचालन व आभार डॉ. नीना गोगटे यांनी केले.

# गुंटूर-छत्रपती संभाजीनगर एक्सप्रेस १२ दिवस उशिराने धावणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुंटूर विभागातील गाझुलापल्ली- नंदीपल्ली- नंद्याल दरम्यान १४.५६ किमी लांबीच्या दुहेरी रेल्वे मार्गाच्या कामासाठी १२ दिवसांचा प्री-नॉन इंटरलॉकिंग व नॉन इंटरलॉकिंग ब्लॉक घेण्यात येणार आहे.

या कामामुळे नांदेड विभागातून धावणाऱ्या गाडीच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. गाडी क्र. १७२५३ गुंटूर - छत्रपती संभाजीनगर एक्सप्रेसच्या वेळेत पुढीलप्रमाणे बदल राहील. दि. २६ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२६ (एकूण ९ फेऱ्या) ही गाडी नियोजित वेळेपेक्षा ४५ मिनिटे उशिराने धावेल. दि. ४ नोव्हेंबर २०२६ (१ फेरी) ही गाडी नियोजित वेळेपेक्षा १२० मिनिटे (२ तास) उशिराने सुटेल. दि. ५ व ६ नोव्हेंबर २०२६ (एकूण २ फेऱ्या) ही गाडी नियोजित वेळेपेक्षा ६० मिनिटे उशिराने सुटेल.

प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी रेल्वेच्या अधिकृत माध्यमांद्वारे गाडीच्या वेळापत्रकाची खात्री करून घ्यावी, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# जि. प. प्रा. शाळा, धनज (बु) शाळेत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनंजय (बु.) शाळेत सोमवार, दि. २६ रोजी वैद्यकीय पथक लोहा यांच्याकडून सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी डॉ. मुदखेडे जी. एम. वैद्यकीय अधिकारी लोहा यांनी शालेय विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक सवयी,आरोग्याची काळजी कशी घ्यावी, काय खावे काय खाऊ नये याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

पहिली ते आठवी वर्गातील २२ मुले आणि ३४ मुलींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. गंभीर आजार असलेल्या दोन विद्यार्थ्यांना नांदेड येथे प्रस्तावित करण्यात आले तर उर्वरित सर्व विद्यार्थ्यांना औषध गोळ्या देण्यात आल्या. पथकामध्ये डॉ. मुदखेडे जी. एम., डॉ. देशपांडे आर. सी., सांगवे डी. पी., सोनटक्के एस. एम. यांनी काम पाहिले. शाळेचे मुख्याध्यापक राठोड रघुनाथ रामा, गुलाबराव पावडे, शंकर शिंगारे यांनी आरोग्य तपासणीस मदत केली.

# राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी बोरगाव तेलंग व माळकौठा येथे कुटुंबियांचे केले सांत्वन

## मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून सर्वतोपरी मदत मिळवून देणार



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील बोरगाव तेलंग येथील मयत शेतकरी शंकर क्षीरसागर आणि मुदखेड तालुक्यातील माळकौठा येथील मयत शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या कुटुंबियांची राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी नुकतीच भेट घेऊन सांत्वन केले. शासन त्यांच्या पाठीशी असून, शासनाच्या विविध योजनांमधून पात्रतेनुसार लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी बोरगाव तेलंग येथे मयत शेतकरी शंकर क्षीरसागर यांच्या घरी भेट देऊन त्यांच्या पत्नी, आई, वडील व मुलींची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. कुटुंबियांना धीर देत शासनाकडून आवश्यक मदत मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच शंकर क्षीरसागर यांच्या वडिलांवर औषधोपचार करण्यासाठी संबंधित आरोग्य विभागाला निर्देश दिले.

मुदखेड तालुक्यातील माळकौठा येथे मयत शेतकरी चंद्रकांत शिंदे यांच्या घरी भेट देऊन राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी त्यांच्या आई, पत्नी व मुलांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. या कठीण प्रसंगी शासन त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी असून, विविध शासकीय योजनांचे पात्रतेनुसार लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोरगाव तेलंग येथे तहसीलदार संजय वारकड, गटविकास अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. माळकौठा येथे आमदार श्रीजया चव्हाण यांच्यासह तहसीलदार, गटविकास अधिकारी, संबंधित अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

# अंतर महाविद्यालयीन पुरुष फुटबॉल स्पर्धा संपन्न



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने पुरुष फुटबॉल आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन एसजीजीएस कॉलेजच्या मैदानावर करण्यात आले.

या स्पर्धेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयाने आंतर-राष्ट्रीय दर्जाच्या फुटबॉल मैदानाची केलेली उत्कृष्ट निर्मिती व देखभाल, हिरव्यागार गवताने सजलेले, अतिशय सुंदर आणि उत्कृष्ट स्थितीत असलेले मैदान खेळाडूंसाठी विशेष आकर्षण ठरले. तसेच खेळाडूंना प्रदान करण्यात आलेल्या आकर्षक व भव्य ट्रॉफीजची रचनाही अत्यंत वाखाणण्याजोगी होती. या ट्रॉफीजना जणू विश्वचषकाची झलक होती.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी एसजीजीएस महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने, क झोन चेअरमन डॉ. महेश वाकरडकर, स्पर्धेच्या निवड समितीचे अध्यक्ष डॉ. कुंटूरवार, डॉ. पैंजणे तसेच महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

एसजीजीएस महाविद्यालयात उभारण्यात आलेला प्रशस्त इंडोअर बॅडमिंटन हॉल, टेबल टेनिस, योगा तसेच इतर विविध खेळांसाठीची अत्याधुनिक सुविधा उभारण्यात आलेली असून , मुला-मुलींच्या निवासासाठी करण्यात आलेली प्रशस्त व स्वच्छ व्यवस्था, अत्याधुनिक स्टीम बाथ,टॉयलेट्स आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सर्व क्रीडा सुविधा ह्या आंतरराष्ट्रीय स्तराच्या आहेत.

# महानगरपालिकेत महर्षी वाल्मिकी यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)–** आद्यकवी महर्षि वाल्मिकी यांच्या जयंतीनिमित्त दि.२६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता प्रशासकीय इमारतीमध्ये त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

महर्षि वाल्मिकी हे केवळ 'रामायण' या महाकाव्याचे रचनाकार नसून, ते भारतीय संस्कृती, नैतिकता आणि मानवी मूल्यांचे महान मार्गदर्शक आहेत. त्यांनी जगाला मानवकल्याणाचा आणि समाधानाचा मार्ग दाखवला. त्यांचे जीवन आणि त्यांनी दिलेली शिकवण आजही संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. महापुरुषांचे विचार आत्मसात करून शहराच्या विकासासाठी आणि लोककल्याणासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असा सूर या कार्यक्रमात उमटला. अभिवादना नंतर याप्रसंगी भ्रष्टाचार निर्मूलनाची सामुहिक शपथ घेण्यात आली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त गंगाधर ईरलोड, मुख्य लेखापरीक्षक आनंद ऐनवाड, नगरसेवक अभिषेक सौदे, मालमत्ता व्यवस्थापक पदमाकर कावळे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, आयुक्तांचे स्विय सहाय्यक महेश आसणे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

# आक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल नांदेडच्या खेळाडूंचे आंतरशालेय राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत यश




**नांदेड (प्रतिनिधी)–** मलकापूर जिल्हा बुलढाणा येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्षे मुली या वयोगटात लातूर विभागाकडून आक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूलच्या कु. आस्था माने, शर्वरी वडवळे, प्रांजल आनेवार, ईशिका देवराये व निहारिका कोळेकर यांच्या संघाने आंतरशालेय राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवून नांदेडच्या बॅडमिंटन क्षेत्रात इतिहास घडविला आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा च्या बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय बँडमिंटन क्रीडा स्पर्धेमध्ये या विद्यार्थ्यांने घवघवीत यश संपादन केलेले आहे या क्रीडा स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे आनंदराव पाटील माने, सौ. वनिता देवसरकर,माने नेत्रालयाचे संचालक डॉ. टी. एम. माने, डॉ. सौ. रूपाली माने, शंकरराव चेतन माने, किरण माने, शंकरराव वडवळे यांच्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# स्वारातीम विद्यापीठात महिर्षी वाल्मिकी जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात महिर्षी वाल्मिकी यांची जयंती सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षात आयोजित जयंती कार्यक्रमात महिर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, संशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, उपकुलसचिव रवि सरोदे, रवि मोहरीर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, सिस्टिम एक्सपर्ट सुनील जाधव यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी महिर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांना अभिवादन केले.

# लाखोंचा खर्च टाळून दोन तासांत लग्न; करमोडीत साखरपुड्यातच विवाह संपन्न

## आनेराव-जाधव परिवाराचा स्तुत्य आदर्श; हदगाव तालुक्यात चर्चेचा विषय



**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील करमोडी येथे साखरपुड्यातच झालेल्या लग्न सोहळ्याची चर्चा सर्वत्र पसरली. सध्या लग्न म्हटलं की, लाखो रुपयांचा खर्च, भव्य मंडप, रोषणाई आणि दिखाव्याची चढाओढ पाहायला मिळते. मात्र या अनावश्यक खर्चाला फाटा देत करमोडी येथील एका अल्पभूधारक शेतकऱ्याने समाजासमोर नवा आदर्श ठेवला आहे.

करमोडी (ता. हदगाव) येथील अल्पभूधारक शेतकरी रमेश केशव आनेराव यांची कन्या समीक्षा हिचा विवाह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील जिकठाण येथील सुनील गोपीनाथ जाधव यांच्याशी जुळला होता. दोन्ही परिवारांनी पुढील महिन्यात विवाह करण्याचे ठरविले होते.

परंतु, शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर रोजी करमोडी येथे आयोजित साखरपुड्याच्या कार्यक्रमातच दोन्ही परिवारांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. नातेवाईकांच्या उपस्थितीत सुरू असलेल्या साखरपुड्यातच विवाहाची संपूर्ण विधी प्रक्रिया पार पाडत अवघ्या दोन तासांत हा विवाह सोहळा साधेपणाने संपन्न करण्यात आला.

आजच्या महागाईच्या काळात विवाह समारंभात मंडप, सजावट, जेवणावळी, वाद्यवृंद यावर मोठा खर्च केला जातो. सामाजिक प्रतिष्ठेपायी अनेक कुटुंबांना कर्ज काढून लग्न करावे लागते. विशेषतः दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात असताना हा खर्च मोठे आव्हान ठरतो.

या पार्श्वभूमीवर आनेराव आणि जाधव परिवाराने घेतलेला निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. लाखोंच्या खर्चाऐवजी साधेपणाला प्राधान्य देत, रूढीपेक्षा समाजहिताचा विचार करून त्यांनी हा आदर्श विवाह घडवून आणला.

वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन अनाठायी खर्च टाळणारा आणि साधेपणातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला असून, काळाची गरज असलेला असा आदर्श विवाह असल्याची प्रतिक्रिया सरपंच अनिल पवार करमोडीकर यांनी व्यक्त केली.

# पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्याकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस मदत

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस म्हटले की कडक शिस्त आणि गुन्हेगारीविरोधात कठोर कारवाई हे चित्र डोळ्यासमोर येते. मात्र याच खाकी वर्दीमागे एक हळवे मनही दडलेले असते, याचा प्रत्यय पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी पुन्हा एकदा घालून दिला आहे.



राज्यात पाऊस न पडल्याने निर्माण झालेल्या दुष्काळग्रस्त परिस्थितीत बळीराजा अडचणीत सापडला आहे. या शेतकऱ्यांना मदत व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीत एक दिवसाचा पगार देण्याचे आवाहन केले होते.

शासनाने एक दिवसाच्या पगाराचे आवाहन केले असताना, पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी मात्र माणुसकीचे वेगळेच उदाहरण घालून दिले. त्यांनी एक दिवसाचा नव्हे, तर पूर्ण एक महिन्याचा पगार मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा केला आहे.

दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या शेतकरी राजाला शासनाकडून भरीव मदत मिळावी, या उदात्त हेतूने मदत केली आहे.

मागील वर्षी अतिपावसामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती, त्यावेळी देखील चिंचोलकर यांनी आपला एक महिन्याचा संपूर्ण पगार नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा सहायता फंडात जमा करून मदतीचा हात पुढे केला होता.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# मानापमानाच्या नाट्यावर अखेर पडदा!

## वाडीच्या उपजिल्हा रुग्णालयाचा शुभारंभ एकजुटीने होणार, गावकऱ्यांचा एकमुखी निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)-** वाडी बुद्रुक येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेतील नावांवरून निर्माण झालेल्या नाराजीचे अखेर निराकरण झाले आहे. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांनी एकत्रित बैठक घेऊन मतभेद बाजूला ठेवण्याचा निर्णय घेतला. रुग्णालयाच्या उद्घाटन सोहळ्यात कोणताही अडथळा येऊ नये, तसेच परिसराच्या विकासाला प्राधान्य मिळावे, या भूमिकेतून गावकऱ्यांनी एकजुटीने कार्यक्रम साजरा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे येत्या १ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या रुग्णालयाचा शुभारंभ थाटात होणार आहे.

वाडी बुद्रुक येथे उभारण्यात आलेले उपजिल्हा रुग्णालय परिसरातील नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रुग्णालयामुळे वाडी बुद्रुक, पावडेवाडी आणि परिसरातील अन्य गावांमधील नागरिकांना उपचारासाठी जवळच सुविधा उपलब्ध होणार असून, दूरच्या रुग्णालयांपर्यंत करावी लागणारी धावपळ आणि गैरसोय कमी होण्यास मदत मिळणार आहे.

या रुग्णालयाच्या उभारणीसाठी आमदार बालाजी कल्याणकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. शासकीय आणि प्रशासकीय स्तरावर प्रयत्न करून सुमारे तीन वर्षांच्या परिश्रमानंतर रुग्णालयाचे काम पूर्णत्वाकडे नेण्यात आले. त्यामुळे या रुग्णालयाचा शुभारंभ परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

दरम्यान, उद्घाटन सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत काही जणांची नावे नसल्याच्या कारणावरून वाडी बुद्रुक व पावडेवाडी परिसरातील काही ग्रामस्थांसह विरोधी पक्षातील नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे उद्घाटनापूर्वीच कार्यक्रमाभोवती मानापमानाचा वाद निर्माण झाला होता. मात्र, या वादाचा रुग्णालयाच्या उद्घाटनावर परिणाम होऊ नये, यासाठी गावकऱ्यांनी एकत्रित बैठक घेतली. या बैठकीत नाराजी दूर करून सर्वांनी एकत्रितपणे उद्घाटन सोहळा साजरा करण्याची भूमिका मांडण्यात आली.

**उद्घाटन सोहळ्याच्या जागेची शिवसेना आमदारांनी केली पाहणी**



वाडी बुद्रुक येथील १०० खाटांच्या शासकीय उपजिल्हा रुग्णालयाचा उद्घाटन सोहळा येत्या १ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते होणार असून, उद्घाटन सोहळ्याच्या तयारीचा आढावा ना. हेमंत पाटील यांनी मंगळवारी घेतला. प्रत्यक्ष स्थळावर जाऊन त्यांनी पाहणी केली व कार्यक्रमासाठी आवश्यक सूचना दिल्या. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# नांदेड ग्रामीण पोलिसांचा वाळू माफियांवर प्रहार; गोदावरी पात्रातून १.५१ कोटींचा मुद्देमाल जप्त, ८ अज्ञातांविरुद्ध गुन्हे

## वाहेगाव गोदावरी पात्रात दोन ठिकाणी छापे; जेसीबीसह ५ बोटी आणि इंजिने केली जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)-** अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. वाहेगाव येथील गोदावरी नदीपात्रात दोन स्वतंत्र कारवायांमध्ये एकूण १ कोटी ५१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ८ अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी वाहेगाव गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार नांदेड ग्रामीण पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, ४ इसम जेसीबीच्या सहाय्याने नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करत असल्याचे दिसले. पोलिसांना पाहताच ते पळून गेले.

पोलिसांनी घटनास्थळावरून एक जेसीबी (अंदाजे किंमत २५ लाख रुपये) पंचांसमक्ष जप्त केला आहे. याप्रकरणी ४ अज्ञात आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. १३८९/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

त्याच दिवशी त्याच परिसरात दुसऱ्या कारवाईत पोलिसांना काही इसम बोटींच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा करताना आढळले. ते देखील पोलिसांना पाहून पळून गेले.

या ठिकाणी पोलिसांनी ३ मोठ्या लोखंडी बोटी (प्रत्येकी ३० लाखप्रमाणे ९० लाख), २ लहान लोखंडी बोटी (प्रत्येकी १५ लाख प्रमाणे ३० लाख) आणि २ इंजिने (अंदाजे ६ लाख) असा एकूण १ कोटी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त व नष्ट केला आहे. याप्रकरणी ४ अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा क्र. १३९०/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

# अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाचा दणका; वाडी पुयड येथील सावकाराच्या घर- दुकानावर छापा, वह्या, दस्तऐवज जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड तालुक्यातील वाडी पुयड येथे अवैध सावकारी करणाऱ्या संशयित सावकाराविरोधात सहकार विभाग आणि पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने धडक कारवाई केली आहे.

विनापरवाना अवैध सावकारी व्यवहाराबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम १६ अंतर्गत संबंधित व्यक्तीच्या राहत्या घरावर आणि दुकानावर झडती घेण्यात आली. या कारवाईत अवैध सावकारी व्यवहाराशी संबंधित संशयित हिशेब वह्या आणि दस्तऐवज पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहेत.

गैरअर्जदार वाडी पुयड, ता. जि. नांदेड येथील एकाविरुद्ध दाखल तक्रारीवरून दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी ही तपासणी करण्यात आली. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम ३९ अन्वये गुन्हा क्र. १३९१/२०२६ नोंदविण्यात आला असून, पुढील चौकशी सुरू आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली, लातूरचे विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण, जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे आणि उपनिबंधक किशन फिसके यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली. तहसीलदार संजय वारकड यांनी या कारवाईसाठी प्रशासकीय सहकार्य केले.

या पथकात सहकार अधिकारी श्रेणी-१ एम. आर. येवते, बी. बी. बोधगिरे, श्रेणी-२ जी. यू. कुटे, एस. एन. पटके, मुख्य लिपिक ए. वाय. दीक्षित, सहायक सहकार अधिकारी ए. ए. शिंदे, ए. व्ही. वडेपल्ली आणि कनिष्ठ लिपिक एस. व्ही. करंजे यांचा समावेश होता. पोलीस संरक्षण आणि पंचांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली. दरम्यान, जिल्ह्यात विनापरवाना सावकारी करणाऱ्यांबाबतची माहिती नागरिकांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था तथा जिल्हा निबंधक (सावकारी) किंवा तालुक्यातील सहायक निबंधक कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात द्यावी. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन सहकार विभागाने केले आहे.

# वजिराबाद ते रेल्वे स्टेशनपर्यंत अतिक्रमणावर पोलिसांचा हातोडा; ७८ वाहनांवर दंड

**नांदेड (प्रतिनिधी)-** नांदेड शहरातील वाढते अतिक्रमण आणि बेशिस्त पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली शहर वाहतूक शाखेने आज मोठी कारवाई करत एकाच दिवसात ७८ केसेस करून ७८ हजार रुपयांचा दंड वसूल केला.

शहर वाहतूक शाखा आणि महानगरपालिका, नांदेड यांच्या संयुक्त पथकाने दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी ही कारवाई केली.

वजिराबाद चौक ते एस.टी. ओव्हर ब्रिज - बसस्थानक - रेल्वे स्थानक, हिंगोली गेट ते कविता यात्री निवास आणि शिवमंदिर ते



राज कॉर्नर या प्रमुख आणि वर्दळीच्या मार्गांवर ही मोहीम राबवण्यात आली.

या मोहिमेत शहर वाहतूक शाखेचे अधिकारी मारुती मुंढे-अंमलदार, RCP पथक आणि मनपा पथक सहभागी झाले होते. कारवाई दरम्यान रस्त्यालगतचे अतिक्रमण, हातगाड्या, फळ विक्रेते, टपऱ्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे साहित्य हटवण्यात आले. तसेच चुकीच्या पद्धतीने पार्किंग करणाऱ्या आणि रहदारीस अडथळा करणाऱ्या ७८ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.

सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करू नका, वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी वाहने उभी करू नका. पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलांना वाहन चालवायला देऊ नये, ट्रिपल सीट प्रवास टाळावा आणि सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# चन्नाप्पा पेटेकर यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)-** बिलोली तालुक्यातील खतगाव येथील प्रतिष्ठित शेतकरी चन्नाप्पा केरबा पेटेकर वय ८२ वर्षे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. परिसरात एक प्रतिष्ठित शेतकरी म्हणून त्यांची ओळख होती.

ते ग्रामीण कवी तथा नायगाव येथील रहिवाशी बालाजी पेटेकर, मष्णाजी पेटेकर आणि सहशिक्षक शिवाजी पेटेकर यांचे वडील होत.

# रावण डोंगरे यांचे निधन



**नरसीफाटा (प्रतिनिधी)-** नरसी येथील रहिवाशी रावण ईरना डोंगरे यांचे अल्पशा आजाराने २७ ऑक्टोबर रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. रावण डोंगरे यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. ते पत्रकार विरेंद्र डोंगरे यांचे वडील, तलाठी मनोहर तेलंग, डेंबुजी फोर्स राज्य अध्यक्ष कैलास तेलंग यांचे मेहुने होत.

# शकुंतलाबाई पाटील यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)-** मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा(ह.मु.मुखेड) येथील रहिवासी शकुंतलाबाई केशवराव पाटील यांचे मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्याच दिवशी दुपारी ४ वाजता चांडोळा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ मुले, सुना, मुलगी, जावई, नातवंड असा परिवार आहे.

# संजय आनेवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)-**येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे निदेशक संजय नारायणराव आनेवार यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान निधन झाले. ते कृषीक्रांती सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष नारायणराव आनेवार यांचे ज्येष्ठ चिरंजीव, तर संदीप व डॉ. सचिन आनेवार यांचे बंधू होत. आयटीआय कर्मचारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष व विद्यमान कोषाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. तसेच आयटीआय निदेशक कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी म्हणून कार्यरत होते.

# कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)-** सततच्या नापिकीला कंटाळून आणि बँकेचे कर्ज कसे फेडावे या तणावातून एका ५२ वर्षीय शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना तालुक्यात घडली आहे. लोहा तालुक्यातील रिसनगाव येथे दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. मयत शेतकऱ्याचे नाव संजय कचरू मुकनर असे आहे. ते शेतातील सततच्या नापिकीमुळे चिंतेत होते. बँकेचे घेतलेले कर्ज फेडायचे कसे, या विवंचनेतून त्यांनी टोकाचे पाऊल उचलत विषारी औषध प्राशन केले.

# भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्यावतीने २२ नोव्हेंबर रोजी वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

## नाव नोंदणी सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)-** भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघ नांदेड द्वारा ब्राह्मण समाजाचे वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले असून हा मेळावा दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी श्री हनुमान मंदिर अशोकनगर नांदेड येथे पार पडणार आहे. या मेळाव्यात येणाऱ्या वधू- वरांची नोंदणी चालू असून सदरील नाव नोंदणीसाठी दि.१० नोव्हेंबर २०२६ अंतिम तारीख असणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली.

ब्राह्मण समाजाच्या विवाहाबाबत अडीअडचणी लक्षात घेऊन भारतीय बहु भाषिक ब्राह्मण महासंघाच्यावतीने वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी हनुमान मंदिर अशोक नगर नांदेड येथे संपन्न होणार. या ब्राह्मण वधू-वर परिचय मेळाव्यामध्ये प्रथम विवाह, घटस्फोटित, विदुर, विधवा वधू-वरांना सहभागी होता येईल. यासाठी पूर्व नावनोंदणी आवश्यक असून नाव नोंदणीची शेवटची तारीख १० नोव्हेंबर आहे. नाव नोंदणीसाठी बंडोपंत कुंटूरकर ९४०३७४४४४९, प्रा. रमाकांत जोशी९८८१५२४०६५,कमलाकर जोशी ९४०४०६२३९५, सुचिता जोशी ९६२३६९९७०९, श्याम गुरू ९७३०९४७०५१ यांच्याशी संपर्क करावा. या मेळाव्यास वधू- वरांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. या वधू, वर परिचय मेळाव्यास जे वधू किंवा वर फॉर्म भरणार आहेत त्यांनी स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचे सांगण्यात येते. सदरील वधू -वर परिचय मेळाव्यात जास्तीत जास्त वधू - वरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय बहुभाषिक ब्राह्मण महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.













**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com